0/C

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती संलग्नित

भारतीय विद्यामंदिर अमरावती व्दारा संचालित

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती

भारतीय विद्या मंदीर अमरावती
द्वारा संचालीत
भारतीय महाविद्यालय
स्थापना - १९८०
मोर्शी

राष्ट्रीय सेवा योजना

# 'विशेष श्रमसंस्कार शिबिर'

# अहवाल

*दत्तकग्राम लाडकी (बु.) ता. मोर्शी, जि. अमरावती*

दि. 17 जानेवारी 2018 ते 23 जानेवारी 2018

# स्वच्छ भारत स्वस्थ भारत

Received
04/04/18

भारतीय विद्यामंदीर अमरावती, व्दारा संचालीत

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी जि. अमरावती

विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्त ग्राम लाडकी (बु.)

## सत्र : २०१७-१८ (अहवाल)

- प्राचार्याचे नाव - श्री. जी. एस. मेश्राम
- कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव - डॉ. संदिप म. राऊत
- सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव - डॉ. सावन म. देशमुख
- महिला कार्यक्रम अधिकाऱ्याचे नाव - डॉ. कु. जे. एल. रामटेके

*** मंगळवार -** दि. १६/०१/२०१८ ला दुपारी २:३० वाजता ॲटोरिक्षाने स्वयमसेवकाचे शिबिरस्थळी आगमन झाले. या दिवशी दत्तकग्राम लाडकी (बु.) येथील सरपंच मा. सौ. सुनंदाताई भुयार, गावाचे उपसरपंच डॉ. डिगांबरराव बुरंगे तसेच ग्रा. पं. सदस्यगण यांनी डॉ. संदिप एम. राऊत (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी) डॉ. सावन देशमुख तसेच डॉ. कु. जे. एल. रामटेके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जि. प. प्राथमीक शाळेच्या संपुर्ण परिसर व जगन्नाथ भारती महाराज मंदिराचा सर्व परिसर स्वयमसेवकांनी स्वच्छ केला. यानंतर गावकरी मंडळीशी चर्चा करण्यात आली. रा.से.यो. स्वयमसेवकाची सात गटामध्ये विभागणी करुन गट प्रमुखाची नियुक्ती करण्यात आली. अशाप्रकारे पहिल्या दिवशीचा कार्यक्रम पार पाडण्यात आला.

*** बुधवार -** दि. १७/०१/२०१८ ला सकाळी ५:०० वाजता ग्राम स्वच्छता करण्यात आली. सकाळी ६:०० वाजता योगासने प्रार्थना आणि ९:०० वाजता प्रभातफेरी घेण्यात आली. तसेच सकाळी ११:०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विशेषश्रम संस्कार शिबीराचे उद्घाटन भारतीय विद्यामंदिर संस्थेचे अयक्ष मा. प्रा. डॉ. रमेशजी बिजवे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यांनी आपल्या भाषणातुन स्वयमसेवकांना शिस्त, स्वलंब, नियोजन व श्रमदानाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. जी. एस. मेश्राम यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रम संस्कार शिबीराच्या माध्यमातुन सुप्त गुणांचा विकास सामाजिक जागृती स्वच्छतेचे महत्व आत्मसात करुन प्रत्येकांनी स्वयं प्रकाशित व्हावे असे सांगितले. विषेश म्हणजे राष्ट्रसेवा दल पूणे चे कार्याध्यक्ष श्री. अल्लाऊद्दीन शेख यांनी संविधान जनजागरण यांच्या निमित्यांने संविधान जनजागृती या विषयावर विचार व्यक्त केले. गावाच्या सरपंचा सौ. सुनंदाताई भुयार यांनी तरुणाईच्या माध्यमातुन गावाचा विकास शक्य आहे असे सांगितले. तर उपसरपंच मा. डॉ. दिगांबर बुरंगे यांनी शिबीराच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना ग्रामविकासाचे धडे द्यावे असे सांगितले. या प्रसंगी श्री. नविन कुमार पेठे (सदस्य, महाविद्यालय विकास समिती भा.म.वि. मोर्शी) सौ.

सुनंदाताई भुयार (सरपंच ग्राम पंचायत दत्तकग्राम लाडकी (बु.)) राहुल वडे (पोलिस पाटिल दत्तकग्राम लाडकी (बु.)) राष्ट्रीयसेवा दलाचे श्री. अल्लाहुद्दीन शेख गोपाल कोरडे व सौ. वर्षा धाबे माजी पं.स. सदस्य डॉ. संदिप लव्हाळे, तंटामुक्ती अध्यक्ष प्रविणभाऊ कोहळे, श्री. विजय उमेकर, राजुभाऊ वानखडे (ग्रा.पं. सदस्य) सुधाकरजी खैरकर, श्री. डी. एस. गोबरे सर, श्री. दिलीपभाऊ वानखडे, सर्व ग्राम पंचायत सदस्यगण व गावकरी मंडळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संदिप एम राऊत यांनी केले. संचालन प्रा. डॉ. टेभुर्णे मॅडम यांनी तर आभार प्रा. घनश्याम दाने सर यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील डॉ. एस. बी. बीजवे, डॉ. आर . जी बांबोळे, डॉ. बी. जे. साबळे, डॉ. एस. व्ही. टोपरे, प्रा. व्ही. व्ही. खांडेकर, प्रध्यापक वृंद उपस्थित होते.

सायंकाळी ६:०० वाजता प्रार्थना 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे, इतनी शक्ती हमे दे न दाता, राष्ट्र वंदना केली' या प्रसंगी विद्यार्थ्यांनी प्रार्थनेवर विचार व्यक्त केले. रात्री ८:०० वाजता श्री. रिजवानुद्दीन पटेल (नेत्रहिन कलावंत) यांनी झणकार पंचरंगी सांस्कृतीक कार्यक्रम सादर केला. सादर कार्यक्रमात उत्फुर्त प्रतिसाद मिळाला.

*** गुरुवार -** दि. १८/०१/२०१८ या दिवशी ग्राम स्वच्छता, प्रभात फेरी हे दैनंदिन कार्यक्रम करण्यात आले. सकाळी ९ ते १२ वाजे पर्यंत भुमिगत बंधाऱ्यावर श्रमदान करण्यात आले. दुपारी बौध्दिक सत्रात २:३० वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार या विषयावर मा. गणेशराव राऊत व मा. हरिषभाऊ निशांत यांनी सुंदर व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांना मंत्र मुग्ध केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. सुभाषराव भुयार, तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रा. डि एन. काळे हे होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संदिप एम. राऊत यांनी केले. संचालन प्रज्वल टेकाडे नी तर आभार गुडधे सरांनी मानले.

रात्री ६:०० वाजता गुरुदेव सेवा मंडळ लाडकी (बु.) व रा.से.यो. स्वयंसेवक यांनी सामुदायिक प्राथना व रा.से.यो. प्रार्थना केली. या प्रसंगी काही स्वयमसेवकांनी प्रार्थनेवर आपले विचार व्यक्त केले. रात्री ८:०० वाजता मा. आशिष झोडे आणि संच यांनी सुर संगम अंतर्गत लोकगित व देशभक्ति गित सादर केले या प्रसंगी काही स्वयमसेवकांनी आपली गायनाची कला सादर केली.

कार्यक्रमाचे संचालन स्नेहा पवारने तर आभार अमर खोब्रागडे यांने मानले कार्यक्रमात रा.से.यो. स्वयमसेवक व गावकरी मंडळींनी उत्तम प्रतिसाद दिला.

* शुक्रवार - दि. १९/०२/२०१८ ला सकाळी ग्राम स्वच्छता, प्रार्थना, योगासने व प्रभात फेरी काढण्यात आली तसेच सकाळी ९:०० ते १२:०० वाजेपर्यंत भुमिगत बंधाऱ्यावर श्रमदान करण्यात आले. दुपारी २:३० वाजता बौध्दिक सत्रामध्ये स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन या विषयावर मा. संजयजी बन्सोड (जिल्हा ग्रंथालय, अधिकारी अम.) यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. कु. रामटेके मॅडम तर प्रमुख अतिथी पाझारे सर (ग्रंथपाल भा.म.वि. मोर्शी) प्रास्ताविक, पाझारे सर यांनी सुत्र संचालन गौरव कोंडे यानी तर आभार रोशन ठाकरे यांनी मानले. सायंकाळी ६:०० वाजता प्रार्थना झाली.

सायंकाळी ८:०० वाजता मनोरंजनातुन समाज प्रबोधन या कार्यक्रमातुन मा. विद्याराज कोरे यांनी आपल्या उत्कृष्ट शैलीतुन लोकांना मनोरंजनातुन समाज प्रबोधन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन जान्हवी राऊत ने तर आभार हरिष तळोकार यांनी केले.

* शनिवार - दि. २०/०१/२०१८ ला सकाळी ग्राम स्वच्छता योगासने प्रार्थना व प्रभात फेरी काढण्यात आली. सकाळी ९:०० ते १२:०० या कालावधीत भुमीगत बंधाऱ्यावर श्रमदान करण्यात आले. दुपारच्या बौध्दीक सत्रामध्ये १:०० ते ४:०० दरम्यान राष्ट्रीय सेवा योजनेतुन जलसंधारण या विषयावर डॉ. बी. एस. चंदनकर (सदस्य महाविद्यालय विकास समीती भा.म.वी. मोर्शी) यांनी मार्गदर्शन केले. तसेच पाणी फाऊंडेशनच्या टिमने भेट देऊन स्वयमसेवकांना व्हिडीओ क्लिप दाखवुन जल संधारणविषयी मार्गदर्शन केले. त्यामध्ये श्रीकांत उमप, जानवी खडसान, अंबादास खोंडे, राणी सुर्वे, गौरव नवले हे होते.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन आचल घाटोळ ने प्रस्ताविक डॉ. संदिप राऊत सर व आभार वर्धीनी कोहळे नी केले.

सायंकाळी ६:०० वाजता प्रार्थना झाली. सायंकाळी ८:०० वाजता ''सम्मोहन : समज-गैर समज व इंटरनेटची वाढती व्यसनाधीनता'' या विषयावर डॉ. रवीकुमार सरोदे (मनसोपचार तज्ञ अम.) यांनी स्वयंमसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यस्थानी श्री. दाणे सर प्रमुख अतिथी आशिष देशपांडे सर व संचालन डॉ. संदिप राऊत सरांनी व आभार प्रा. मनिष गुडधे सरांनी मानले. या कार्यक्रमात स्वयंमसेवक व गावकरी मंडळींनी उत्फुर्त प्रतिसाद दिला.

* रविवार - दि. २१/०१/२०१८ ला सकाळी ग्राम स्वच्छता योगासने प्रार्थना व प्रभात फेरी काढण्यात आली. सकाळी ९:०० ते १२ या कालावधीत भुमीगत बंधाऱ्यावर श्रमदान करण्यात आले. दुपारच्या बौध्दीक संत्रामध्ये व्यक्तिमत्व विकास या विषयावर डॉ. आशिष लोहे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात स्वंयसेवक व गावकरी मंडळींनी मोठया संख्येत प्रतिसाद दिला.

सादर कार्यक्रमात अध्यक्ष म्हणुन गंगाधरजी भुयार तर संचालन कु. निलीमा भुजाडे, प्रस्ताविक रामटेके मॅडम व आभार कु. प्रिया आखरे नी केले. तसेच दुपारच्या दुसऱ्या सत्रामध्ये ``मानवी जिवनाचा आधार संस्कार`` या विषयावर मा. श्री. दिलीपजी बुरंगे (महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त शिक्षक) यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यक्ष प्रा. व्हि. व्हि. खांडेकर हे तर प्रमुख अतिथी मा. श्री. वामनराव उमेकर होते. संचालन कु. सुनंदा बडनगेर ने केले. तर आभार प्रतिक्षा जावरकर ने केले.

रात्री ६:०० वाजता प्रार्थना घेण्यात आली. सायंकाळी ८:०० वाजता ``वऱ्हाडी हास्य कवी संमेलन`` कार्यक्रमात ``प्रतिभा साहित्य संघ`` अकोला (महाराष्ट्र), कवी विठ्ठल कुलट व त्यांच्या सहकाऱ्यांनी कवीतांच्या माध्यमातुन शेतकऱ्यांच्या समस्या समाजातील भेडसावनारे ज्वलंत प्रश्न यावर कविताचे सादरीकरण करुन स्वयमसेवक व गावकऱ्याचे मनोरंजन केले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन मा. प्रा. राजीव शिंदे (गो. सी. टोम्पे महाविद्यालय, चांदूर बाजार) कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. घनश्याम दाणे नी केले. प्रास्ताविक श्री. डी. सी. वानखडे नी व आभार डॉ. संदीप एम. राऊत सरांनी केले. सदर कार्यक्रमास स्वंयसेवक व गावकऱ्यांनी उत्कुर्त प्रतिसाद दिला.

*** सोमवार -** दि. २२/०१/२०१८ ला सकाळी ग्रामस्वच्छता योगासने प्रार्थना व प्रभातफेरी काढण्यात आली. सकाळी ९:०० ते १२:०० या कालावधीत भुमीगत बधाऱ्यावर श्रमदान करुन बंधारा पूर्ण करण्यात आला. हा बंधारा १०x०६x१० लांबी-रुंदी व खोल करण्यात आला. या प्रसंगी गावच्या सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य पोलीस पाटील प्रातिष्ठित नागरिक उपस्थित होते.

दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये महिला सक्षमीकरण या विषयावर प्रा. डॉ. टेभुर्णे मॅडम यांनी महिलांच्या समस्या आणि सक्षमीकरण याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणुन प्रा. डॉ. रामटेके मॅडम तर प्रमुख अतिथी म्हणुन टकोरे मॅडम होत्या. सुत्रसंचालन कु. प्रिती भुजाडेने तर आभार संकेत चौधरी ने केले.

या प्रसंगी गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या. रात्री ८:०० वाजता रा.से.यो. स्वंयसेवकांनी सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले व त्यानंतर कॅम्प फायरचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी सर्व रा.से.यो. स्वंयसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

* मंगळवार - दि. २३/०१/२०१८ ला सकाळी ग्रामस्वच्छता, योगासने, प्रार्थना व प्रभातफेरी काढण्यात आली.

"स्वच्छ भारत स्वस्थ भारत" या संकल्पनेवर आधारित १६ जानेवारी २०१८ ते २३ जानेवारी २०१८ या कालावधीत संपन्न झालेल्या विशेष श्रम संस्कार शिबीराचा समारोप २३ जानेवारी २०१८ ला संपन्न झाला. समारोपीय कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणुन भारतीय विद्यामंदीर संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. अनंतराव सोमवंशी, सरचिटणीस मा. डॉ. सतिशजी कुलकर्णी हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. जी. एस. मेश्राम (प्राचार्य, भा.म.वि. मोर्शी) तर प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री. सुखदेवराव राऊत (सदस्य, महाविद्यालय विकास समीती, भा.म.वि. मोर्शी) मा. सुनंदाताई भुयार (सरपंच ग्रा. पं. लाडकी (बु.) मा. दिगांबर बुरंगे, (उपसरपंच,ग्रा. पं. लाडकी (बु.) राहुलजी वडे पोलिस पाटिल, मा. संदीप लव्हाळे (माजी प. स. सदस्य), मा. प्रविण कोहळे, (अध्यक्ष तंटामुक्ती, लाडकी (बु) मा. विजय उमेकर (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती)मा. सुधाकर खैरकर (अध्यक्ष, भारती महाराज संस्थान लाडकी (बु.) व सर्व ग्राम पंचायत सदस्य उपस्थित होते. तसेच गावकरी मंडळी मोठया संस्थेने उपस्थित होते.

समारोपीय कार्यक्रमात मुख्य अतिथी मा. अनंतरावजी सोमवंशी यांनी, विद्यार्थ्यांच्या अंगी, शिस्त स्वावलंबन व सर्वांगिण विकास हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबीरातुन होत असतो. तसेच शिबीर दरम्यान प्राप्त आलेल्या ज्ञानरुपी शिदोरीचा उपयोग विद्यार्थ्यांनी आयुष्यभर करावा असे विचार व्यक्त केले.

तर दुसरे प्रमुख अतिथी मा सुखदेवरावजी राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. जी. एम. मेश्राम सर यांनी स्वंयसेवकाच्या कामाची प्रशंसा करुन रा.से.यो. शिबीरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या प्रसंगी गावच्या पहिल्या नागरिक सरपंच मा. सौ. सुनंदाताई भुयार यांनी आपले विचार मांडताना म्हटले कि, या शिबीर कालावधीमध्ये रा.से.यो. स्वयमसेवकांनी गावकऱ्याची मन जिंकुन घेतली असे सांगितले. डॉ. दिगांबर बुरंगे (उपसरपंच) यांनी आपले विचार व्यक्त करतांना स्वयमसेवकाच्या कामाचा गौरव करुन कौतुक केले. तसेच श्रमसंस्कार शिबीर सर्वबाबतीत यशस्वी झाल्याचे सांगितले.

गावचे पोलिस पाटिल राहुलजी वडे यांनी रा.से.यो. विशेष शिबीरामुळे गावामध्ये नवचैत्यन्य निर्माण झाले. शिवाय स्वयमसेवकांच्या कार्यामुळे आमच्या गावातील लहान विद्यार्थ्यांवर संस्कार झाल्याचे सांगितले. या प्रसंगी निखील राजेन्द्र माने व कु. नेहा प्रकाशराव

पवार, चेतन वलीवकर, श्रध्दा खडसे, गौरव कोंडे, या स्वयमसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. संदिप एम. राऊत यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सात दिवसीय शिबीराचा लेखाजोखा सांगीतला. तसेच काय्रक्रमाचे सुत्रसंचालन रा.से.यो. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जे. एल. रामटेके मॅडम यांनी केले. तर आभार प्रा. घनश्याम दाणे सर यांनी मानले.

या सात दिवसीय श्रमसंस्कार शिबीरामध्ये जलसिंचनाच्या दृष्टिने भुमीगत बंधारा १०x०६x१० असा तयार केला. तसेच शिबीरामध्ये श्रमदाना बरोबर नियमीत कार्यक्रमात ग्राम स्वच्छता, योगासने, प्रार्थना, प्रभात फेरी, श्रमदान, बौध्दिक कार्यक्रम व सांस्कृतीक कार्यक्रम ही सर्व कामे यशस्वीरित्या पुर्ण झाली. तसेच शिबिराच्या यशस्वीत करिता डॉ. एस. बी. बिजवे, प्रा. आर. जी. बांबोळे, प्रा. व्हि. व्हि. खांडेकर, प्रा. दिपक काळे, प्रा. एल. आर. टेभुर्णे, डॉ. शिरिष टोपरे, डॉ भगवान साबळे, प्रा. ए. एस. पाझारे व माहाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी वृंद यांचे सहकार्य लाभले.

याच बरोबर लाडकी बु. येथील सौ. सुनंदाताई भुयार उपसरपंच श्री. डॉ. दिगांबर बुरंगे पोलिस पाटील राहुलजी वडे माजी प.स सदस्य संदिपजी लव्हाळे, प्रविण कोहळे, राजुभाऊ वानखडे सुधाकर खैरकर, श्री. डी. एस. गोबरे, विजय उमेकर, दिलीप वानखडे, मंगेशभाऊ टाकोडे, गणेशराव राऊत सुभाषराव भुयार, हरिष निशान व येथील सर्व ग्रामवासियांचे सहकार्य लाभले.

ग्रामवासियांच्या उत्तम सहकार्यामुळे सात दिवसाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर यशस्वी होण्यास मोठ मदत झाली.

डॉ. संदिप एम. राऊत
(रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी)
भारतीय महाविद्यालय मोर्शी
Prof. Incharge
N.S.S.Unit
Bhartiya Mahavidyalaya
Morshi.

श्री. जी. एस. मेश्राम
(प्राचार्य)
भारतीय महाविद्यालय मोर्शी
Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi.



दि. १७.०१.२०१८ ते २३.०१.२०१८ दरम्यान आयोजित
विशेष श्रम संस्कार शिबिराचे उद्घाटन करताना मा. डॉ. रमेश
बिजवे (अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर अमरावती) प्रसंगी उपस्थित
मा. नविन कुमारजी पेठे, सौ. सुनंदाताई भुयार (सरपंच)
मा. श्री जी. एस. मेश्राम (प्राचार्य) मा. डॉ. दिगांबरराव बुरंगे (उपसरपंच)




विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी विचार व्यक्त
करताना डॉ. रमेशराव बिजवे (अध्यक्ष) भारतीय विद्यामंदिर
अमरावती




शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमा मध्ये संविधान जनजागरण याचे निमित्य विचार व्यक्त करताना मा. डॉ. अलाउद्दीन शेख (राष्ट्रसेवा दल, पुणे)




विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय भाषण करतांना मा. श्री. जी. एस. मेश्राम (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय मोर्शी



दि. १८.०१.२०१८ ला सायंकाळच्या सत्रामध्ये झन्कार पंचरंगी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करतांना मी. रिजवानुद्दीन पटेल (नेत्रहिन कलावंत




प्रार्थने मध्ये सहभागी डॉ. एस. एम. राउत, प्रा. भुरेवे व पुरुषोत्तम खोब्रागडे .




दि. २५.०१.२०१८ च्या दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार" या विषयावर विचार व्यक्त करतांना मा. गणेशरावजी राउत कार्यक्रमाचे अध्यक्ष सुभाषरावजी भुसार




२५.०१.२०१८ दुपारच्या बौध्दिक सत्रामध्ये राष्ट्रसंतांचे विचार या विषयावर विचार व्यक्त करतांना हरिषजी निमा[illegible] या प्रसंगी उपस्थित डॉ. राजेशजी मिरगे (समन्वयक, रासेयो संत गाडगेबाबा अम. विद्यापीठ अम.) हे उपस्थित होते




दि. १८.०१.२०१८ ला दुपारच्या बौद्धिक सत्राच्या दरम्यान शिबिराला भेट दिली असता मार्गदर्शन करताना डॉ. राजेशजी मिरगे (समन्वयक, रा.से.यो सं.गा.बा.अम.




१८.०१.२०१८ ला स्वयंसेवक व स्वयंसेविकांना मार्गदर्शन करताना मा. डॉ. राजेशजी मिरगे (समन्वयक, रा.से.यो सं.गा.बा.अवि.



१८.०१.२०१८ ला सायंकाळी 'सुरसंगम' या कार्यक्रमात गीत सादर करतांना स्वयंसेवक




१८.०१.२०१८ ला सायंकाळी 'सुरसंगम' या कार्यक्रमात गीत सादर करतांना स्वयंसेविका




दि. १९.०१.२०१८ ला दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये स्पर्धापरिक्षा मार्गदर्शन या विषयावर विचार व्यक्त करतांना मा. श्री संजय बनसोड (जिल्हा ग्रंथालय अधिकारी अम.) प्रमुख उपस्थित मा. अरविंद पासार, मा. सुभाषरावजी भुयार.




१९.०१.२०१८ ला दुपारच्या सत्रामध्ये विचार व्यक्त करतांना डॉ. एस. एम. राउत (कार्यक्रम अधिकारी





२१.०१.२०१८ ला रात्रीच्या सत्रामध्ये "मनोरंजनातून समाज प्रबोधन" या विषयावर मार्गदर्शन करतांना मा. विधाराज कोरे व संच





२१.०१.२०१८ ला रात्रीच्या सत्रामध्ये "मनोरंजनातून समाज प्रबोधन" करतांना मा. विधाराज कोरे व संच




२०.०१.२०१८ ला दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये "रा.से.यो तून जलसंधारण" या विषयावर विचार व्यक्त करतांना। मा. डॉ. बि. एस. चंदनकर



२०.०१.२०१८ ला दुपारच्या बौद्धिक सत्रामध्ये "रा.से.यो तुन जलसंधारण. या विषयावर मार्गदर्शन करतांना। वाटरफाउंडेशने अविनाश उमक व त्यांचे सहकारी विद्यार्थीशी चर्चा करतांना



२३.०१.२०१८ ला दुपारच्या सत्रात वाटर फाउंडेशनच्या वतीने चित्रफीत दाखविताना



रा.से.यो.तून जलसंधारण या विषयावरील बौद्धिक सत्रामध्ये सहभागी स्वयंसेवक -




२०.०१.२०१८ ला रात्रीच्या सत्रामध्ये संमोहन: समज आणि गैरसमज या विषया संदर्भात मार्गदर्शन करतांना डॉ. रविकुमार सरोदे (मानसोपचारतज्ञ अम.)




२०.०१.२०१८ ला रात्रीच्या सत्रात समोहन समज गैरसमज या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. रविकुमार सरोदे



२१.०९.२०१८ ला बुद्ध विहारामध्ये स्वच्छता केल्यानंतर पुष्प अर्पण करतांना डॉ. जे एल. रामटेके (महिला कार्यक्रम अधिकारी




२१.०९.२०१८ ला स्वच्छता अभियाना नंतर आयोजित कार्यक्रमामध्ये विचार व्यक्त करतांना प्रा. घनश्याम दाभे (भा.म.वि. मोर्शी)




दि. २१.०१.२०१८ ला दुपारच्या सत्रामध्ये "अंधश्रद्धा निर्मूलन" या विषयावर विचार व्यक्त करतांना मा. डॉ. आशिषजी लोहे (वक्ते)




दि. २१.०१.२०१८ ला दुपारच्या सत्रामध्ये "मानवी जिवनाचा आधार संस्कार" या विषयावर विचार व्यक्त करतांना मा. डॉ. भैय्यासाहेब चिखले